दूरध्वनी :२५३३१२११
२५३३१५९०

# ठाणेमहानगरपालिका,ठाणे

महांनगरपालिकाभवन,सरसेनानीजनरलअरुणकुमारवैद्यमार्ग,चंदनवाडी,पांचपाखाडी,ठाणे-४००६०२.
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

==============================================================

संदर्भक्र./ठा.म.पा/कोविड-१९/प्रतिबंध/आयुक्त/१५८/२०२० दिनांक: ३० / ०६ /२०२०

## : आदेश :

**विषय :**कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये लॉकडाऊनकरणे.

**संदर्भ :** १) साथ रोग प्रतिबंधक अधिनियम १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) शासन अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई १३ मार्च, २०२०
४) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडील आदेश क्र.DMU-2020/CR.92/DisM-1 दि.२९ जून, २०२० चे आदेश.

ज्याअर्थी, आयुक्त ठाणे महानगरपालिका यांची खात्री झाली आहेकी, कोविड-१९ विषाणूचा प्रसार थांबविण्यासाठी ठाणे शहरामध्ये लॉकडाऊन करणे गरजेचे आहे आणि यापूर्वीच जागतिक आरोग्य संघटनेने महारोगराई/ (साथीचा रोग) (सर्व देशभर किंवा खंडभर) असलेला म्हणून घोषित केलेला आहे. आणि म्हणूनच त्याचा प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यापासून बचाव करण्यासाठी पुढील काही आपत्कालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, साथरोग अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या सर्व संबंधित तरतुदींसहप्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन, मी डॉ.विपिन शर्मा, आयुक्त ठाणे महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका हद्दीत दि.०२/०७/२०२० रोजी सकाळी ७.०० ते दि.१२/०७/२०२० सकाळी ७.०० वाजेपर्यत लॉकडाऊन जाहिर करत आहे. तसेच सर्व हॉटस्पॉटमध्ये अत्यंत प्रभावीपणे लॉकडाऊनची अंमलबजावणी केली जाईल. या कालावधीत खालील नियम व उपाययोजनाची अंमलबजावणी केली जाईल.

१) अत्यावश्यक आणि नाशंवत वस्तूच्या ने-आण करण्याशिवाय इतर सर्व कारणांकरिता ठाणे महानगरपालिका हद्दीत लॉकडाऊन लागू असेल.

२) इंटरसिटी, एमएसआरटीसी बसेस आणि मेट्रोसह सर्व सार्वजनिक परिवहन सेवांना परवानगी दिली जाणार नाही. टॅक्सी, ऑटोरिक्षा , यांना परवानगी नाही. तथापि, आपत्कालिन वैद्यकीय सेवा घेण्यासाठी/ देण्यासाठी प्रवाशांच्या वाहतुकीस परवानगी असेल. या ऑर्डर अंतर्गत ड्रायव्हर शिवाय केवळ एका प्रवाशासह खाजगी वाहनांना, परवानगी असलेल्या जीवनावश्यक वस्तु, आरोग्य सेवा आणि या ऑर्डर अंतर्गत मान्य कृतींकरिता परवानगी असेल.

३) सर्व आंतरराज्यीय बस आणि प्रवासी वाहतुक सेवांचे, (खाजगी वाहनांसह), तसेच खाजगी ऑपरेटरांकडून कामकाज बंद असेल तथापि बाहेरुन येऊन, बाहेर जाणाऱ्या टुरिस्ट वाहनांना परवानगी असेल.

४) ज्या प्रत्येक व्यक्तीला घरात वेगळे ठेवणे आवश्यक आहे त्यांनी त्याचे सक्त पालन केले पाहिजे. नाहीतर तो / ती कठोर दंडात्मक कारवाईसाठी जबाबदार असेल आणि तिला/त्याला महानगरपालिकेच्या क्वॉरंटाइन सेंटर मध्ये स्थलांतरित केले जाईल.

30-06-20

५) सर्व रहिवासी घरीच राहतील आणि सामाजिक परवानगीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करुन, वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या अटींचे पालन करुन, केवळ परवानगी असलेल्या कामासाठीच बाहेर येतील.

६) सार्वजनिक ठिकाणी अत्यावश्यक बाबींच्या खरेदीसाठी ५ पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास प्रतिबंध आहे.

७) व्यावसायिक आस्थापना कार्यालये आणि कारखाने, कार्यशाळा, गोदाम इत्यादींसह सर्व दुकाने त्यांचे कामकाज बंद ठेवतील. तथापि, सतत प्रक्रिया आणि फार्मास्युटिकल्स, इत्यादी आवश्यक असलेल्या उत्पादन आणि उत्पादक युनिट्सना परवानगी असेल. पुढे डाळ व तांदुळ गिरणी, खाद्य व संबंधित उद्योग, दुग्धशाळा, खाद्य व चारा इत्यादींच्या, आवश्यक वस्तूंच्या उत्पादनात गुंतलेली मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स चालविण्यास परवानगी असेल.

८) सरकारी कार्यालये या कालावधीत कमीतकमी कर्मचाऱ्यांसह ऑपरेट करण्याची परवानगी असेल आणि ते चेक काऊंटरजवळ, एकमेकांपासुन ३ फुट अंतर ठेवणे अशा सामाजिक अंतराची खात्री करण्यासाठी पावले उचलतील. ते त्यांच्या आवारात योग्य स्वच्छता आणि (हात ) सॅनिटायझर्स / हात धुण्याच्या सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करतील.

९) आवश्यक वस्तू आणि सेवा प्रदानकरणाऱ्या खालील दुकाने / आस्थापनांना वरील प्रतिबंधामधून वगळण्यात येत आहे.

a) बँका / एटीएम्स / विमा / आणि संबंधित बाबी.

b) प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे

c) आय.टी. आणि आयटीईएस, टेलिकॉम, टपाल, इंटरनेट आणि डेटा सेवांसह.

d) पुरवठा साखळी व जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक व उपलब्धता.

e) कृषी वस्तु आणि उत्पादने आणि सर्व वस्तूंची निर्यात आणि आयात.

f) अन्न, फार्मास्युटिकल्स आणि वैद्यकीय उपकरणे यासह आवश्यक वस्तूंचे ई कॉमर्स (वितरण).

g) पाळीव प्राण्यांसाठी बेकरी आणि पशुवैद्यकीय आस्थापने.

h) रुग्णालये, फार्मेसि आणि ऑप्टिकलस्टोअर्स, फार्मास्युटिकल्स मॅन्युफॅक्चरिंग्ज आणि त्यांचे व्यापारी आणि त्यांची वाहतूक.

i) पेट्रोल पंप, एलपीजी, गॅस, तेल एजन्सी, त्यांची गोदामे आणि त्यांची संबंधित वाहतूक कार्ये, केवळ अत्यावश्यक सेवेतील पास धारकांसाठी.

j) सर्व सुरक्षा आणि सुविधा व्यवस्थापन सेवा (ज्यात खाजगी एजन्सीद्वारे) आवश्यक सेवा पुरविणाऱ्या संस्थांना पुरविल्या जातात.

k) खाजगी आस्थापना, ज्या आवश्यक सेवांच्या सहाय्यकारी सेवा किंवा कोविड-१९ च्या नियंत्रणासाठी सहाय्य करणाऱ्या सेवा.

l) वरील संबंधित पुरवठा साखळी.

30-06-20

m) सर्व अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी हे लक्षात घ्यायला हवे की तत्वत: मूलभूत कठोर प्रतिबंध लोकांच्या हालचालींशी संबंधित आहेत.

n) मद्यविक्रीची दुकाने केवळ होम डिलीव्हरी अनुज्ञेय आहे.

o) जे इंडस्ट्रीय युनिट सद्यस्थितीत सुरु आहेत ते तसेच सुरु राहतील.

p) दिनांक २३/०६/२०२० च्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे लग्न विषयक कार्यक्रम ५० व्यक्तींच्या संख्येच्या मर्यादेत आयोजित करण्यास मुभा असेल.

१०) राज्य सरकारचे विभाग / कार्यालये आणि सेवा प्रदानकरणारे, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (पीएसयू), केवळ आवश्यक सेवा प्रदान करण्याच्या मर्यादेपर्यंत कार्य करतील.

११) कोविड-१९ रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व खाजगी व सरकारी रुग्णालयांमध्ये सर्व वैकल्पिक शस्त्रक्रिया नियोजित करण्यात याव्यात.

१२) संबंधीत संस्था, संघटना व आस्थापनांच्या संदर्भात मा.पोलिस आयुक्त यांचे अधिनस्त अधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी आणि इतर सक्षम प्राधिकारी उपरोक्त नियम आणि अंमलबजावणीसाठी अधिकृत, माणूसकीच्या व न्याय मार्गाने सर्व आवश्यक उपाययोजना करतील.

१३) या नियमांच्या कोणत्याही तरतूदीचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती / संस्था यांचेवर महामारी रोग अधिनियम,१८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, च्या अंतर्गत इतर संबंधीत कायदे व नियमांच्या तरतूदीनुसार कारवाई केली जाईल.

१४) या नियमांनुसार कोणत्याही गोष्टी केल्यास किंवा चांगल्या हेतूने कोणत्याही गोष्टी केल्यास, त्या व्यक्तीविरुध्द खटला किंवा कायदेशीर कारवाई होणार नाही.

१५) विविध प्राधिकरणाद्वारे, पूर्वी जारी केलेले सर्व आदेश, अंमलबजावणी संस्था, या आदेशासह अधिक्रमीत केले जातील.

30-06-20

डॉ.विपिन शर्मा भाप्रसे
महापालिका आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रत:**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२) मा. पालकमंत्री ठाणे तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३) मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी
४) मा. विभागीय आयुक्त, कोकण
५) मा. पोलिस आयुक्त, ठाणे
६) जिल्हाधिकारी ठाणे .
७) पोलिस अधिक्षक ठाणे (ग्रामीण)
८) मा. महापौर, मा. उप महापौर, मा. सभापती - स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
९) स्विय सहाय्यक, मा.आयुक्त व अतिरिक्त आयुक्त - १ व २ यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
१०) उपआयुक्त (मुख्यालय), सर्व उपआयुक्त - परिमंडळ यांजकडे माहितीसाठी,
११) सर्व सहाय्यक आयुक्त / सर्व विभागप्रमुख, समन्वय अधिकारी - नागरी सुविधा केंद्र,
१२) मुख्यालय व सर्व प्रभाग समितीकार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

D:covid19 orders and all files/f.lockdown/lockdown order after 30 june